सं.फौ.ख.क्र.७३/२०२४
सरकार-वि- सुनिल
नि.क्र.११ पुढे

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष शपथेवर सुरु -**

माझे नाव- शेख जमील शेख नबीब
वय – ४५ वर्षे, व्यवसाय- मजुरी
राहणार –बाखर्डी, ता.कोरपना, जि.चंद्रपूर.

**विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्त्या श्रीमती टि.बी.नेवारे यांचेमार्फत सरतपास-**

१. घटना चार ते पाच वर्षापूर्वी मार्च महिन्यात घडली. घटनेच्यावेळी मी माझ्या घरी बाखर्डी येथे बसून होतो. घटनेच्यावेळी माझी पत्नी शमीना जमील शेख ही घरी हजर होती. मी घराबाहेर असतांना मला ओरडण्याचा आवाज आला. त्यानंतर मी घरी गेलो घरी गेल्यानंतर सुनिल निंदेकर व त्याची पत्नी माझ्या पत्नीला शिवीगाळ करीत होते. साली चिनाल, तु नंगी आहे, तुला मारून टाकीन असे म्हणून अश्लील शिवीगाळ करीत होते. तसेच सुनिलची पत्नी हिने माझ्या पत्नीचे केस ओढले तेव्हा मी माझे काका व साहील यांनी मिळून तिला सोडविले. त्यानंतर मी व माझी पत्नी मिळून गडचांदूर पोलीस स्टेशन गेलो व तेथे आरोपीविरूध्द तक्रार नोंदविली.

२. आम्ही कुत्रा पाळला होता त्या कारणावरून आरोपींनी आमच्यासोबत झगडा भांडण केले होते. मी आरोपी क्र.१ व २ यांना ओळखतो.

**सरतपासपुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटपातस विधीज्ञ श्री. पी.जी.पवार वकील साहेब यांच्यामार्फत सुरू**

३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचे घर माझ्या घराला लागून आहे. साक्षदार स्वत:हुन सांगतो की, एक घर पलीकडे आरोपींचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या घरी पाळीव कुत्रा पोसला होता. हे म्हणणे खरे आहे की, कुत्रा पोसला असल्यास त्याचे पालन पोषण आपण स्वत: करतो. हे म्हणणे खरे आहे की, कुत्रा दुस-यांच्या घरी जावू नये त्याकरिता त्याला बांधून ठेवावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनेच्या दिवशी आमचा कुत्रा आरोपींच्या घरी गेला. हे म्हणणे खरे नाही की, माझा कुत्रा आरोपींच्या घरी जावून त्यांच्या घरची भाकर खात होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आमच्या कुत्राल्या हाकलून लावले होते. हे म्हणणे खरे आहे की, आमचे आरोपीसोबत कुत्राच्या कारणावरून वाद झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा वाद आमचा कुत्रा आरोपीकडे गेल्यामुळे झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी माझी पत्नी आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनेबदल मला काहीही माहिती नसतांना मी न्यायालयात सदर घटनेबाबत खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासपुर्ण**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा./-
(दिक्षा दिलीप सहारे)
दि.०३/०८/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(२ रे कोर्ट),कोरपना.